# महिलांचे राजकारण-विशेष संदर्भ: कराड नगरपालिका

**तृप्ती रमेश मोरे ,** संशोधक विद्यार्थी, राज्यशास्त्र विभाग, शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर.

---

**प्रस्तावना**

भारतामध्ये महिलांचा राजकारणामध्ये सहभाग २०व्या शतकामध्ये झाला. स्वातंत्र्य चळवळी पासून राजकीय क्षेत्रामध्ये महिलांनी आपली स्वतःची भूमिका बजावण्यासाठी सकारात्मक दृष्टिकोन ठेवण्यास प्रारंभ केला,यामध्ये सरोजिनी नायडू, कमलादेवी चटोपाध्याय, विजयालक्ष्मी पंडित, अरुणा असफली, राजकुमारीअमृत कौर आदिंनी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. भारतातील स्थानिक स्वराज्य संस्थांचा इतिहास पाहिल्यास, तो अगदी प्राचीन काळापासून असल्याचे दिसते. ब्रिटिश कालखंडामध्ये भारतीयांच्या स्वातंत्र्यांमध्ये घट करण्यात आली. भारतीयांचे अधिकार सिमित झाले पुढे, स्वातंत्र्यप्राप्तीनंतर भारतामध्ये राष्ट्रीय विकास साध्य करण्यासाठी धोरणे आखण्यात आली. देशाचा विकास हा खेड्यापासून व्हावा ही गांधीप्राणित विचारप्रणाली अवलंबण्यात आली आणि कल्याणकारी प्रशासन व्यवस्थेची संकल्पना निर्माण झाली. राष्ट्राच्या विकासाचा पाया हा ग्रामीण भागात असतो हे जाणून, भारतामध्ये स्थानिक स्वराज्य संस्था अवलंबित करण्याचा निर्णय घेतला गेला. सातारा जिल्ह्यातील कराड शहराचा विचार करता, महिलांचा राजकारणामध्ये सहभाग ७३ व्या व ७४ व्या घटना दुरुस्तीने झाला. कराड शहराचा इतिहास पाहायला गेल्यास असे दिसून येते कि, कराड शहर १८५५ साली इंग्रज सरकारने पंतप्रतिनिधींकडून अंमलात आणले. कराडचा सामाजिक,आर्थिक, राजकीय दृष्टिकोनातून विचार केल्यास असे लक्षात येते कि, कराड शहराला मध्यवर्ती स्थान प्राप्त झाले आहे. याच वर्षी नगरपालिकेची स्थापना झाली. शहरात स्थानिक स्वराज्य संस्थांचा उदय झाला आणि शहरांमध्ये यासाठी प्रथम निवडणूक झाली. नागरिकांमधून नेमलेले पहिले नगराध्यक्ष बहादूर कै. नारायण अनंत मुतालिक होय. नगरपालिकेची स्थापना जरी १८५५ साली झाली असली तरी, नगरपालिका स्थापना झाल्यापासून तब्बल १४० वर्षापर्यंत एकही महिला नगराध्यक्ष पदावर नव्हती. शहराच्या लोकसंख्येचा विचार करता निम्म्याहून अधिक लोकसंख्या स्त्रियांची असली तरी राजकारणाच्या पटलावर त्या नव्हत्या.

गांधीजींच्या मते, "भारतीय स्त्रियांना विकासापासून वंचित ठेवणे देशाच्या विकासाची अर्धी शक्ती गमावणे होय. त्यासाठी स्त्री उन्नतीच्या दृष्टिकोनातून समाजाने पुढे आले पाहिजे आणि स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये स्त्रियांचा सहभाग वाढला पाहिजे. या दृष्टीने प्रयत्न व्हायला पाहिजे असे नमूद केले."[१]

प्रस्तुत शोधनिबंधात कराड शहरातील महिला व त्यांचे राजकारण यांचा अभ्यास करणे हा या शोधनिबंधाचा मुख्य हेतू आहे.

**संशोधनाचे महत्त्व**

आधुनिक काळामध्ये देशाच्या विकासासाठी राजकीय क्षेत्रास महत्त्वाचे स्थान आहे. देशाच्या विकासामध्ये राजकीय व्यवस्था महत्त्वाची मानली जाते.भारतामध्ये महाराष्ट्राची राजकीय क्षेत्रातील भूमिका अमूल्य योगदान देते. महाराष्ट्राचा विचार करता, सातारा जिल्हा राजकारणात अग्रस्थानी आहे आणि संपूर्ण सातारा जिल्हयास राजकीय दृष्टिकोनातून पाहिल्यास, कराड तालुका प्रथम स्थानी येतो. तालुक्यामध्ये तब्बल २१६ गावांचा (२०११ च्या जनगणनेनुसार) समावेश होतो. कराड तालुक्याच्या विकासामध्ये केवळ राजकीय क्षेत्रातच नव्हे तर सामाजिक, आर्थिक,शैक्षणिक,औद्योगिक, धार्मिक,सांस्कृतिक अशा क्षेत्रांनीही मौल्यवान कामगिरी केलेली आहे. राजकारणाचा सखोल विचार केल्यास लक्षात येते कि, ग्रामीण व शहरी दोन्ही ठिकाणी विविध व्यक्तींनी मोलाचे योगदान दिले आहे, मग ते पुरुष असो वा महिला. १५ सप्टेंबर १८५५ रोजी कराड नगरपालिकेची स्थापना झाली. सन १९४३ ते १९४६ व १९४९ ते १९५२ दरम्यान सौ. मंगलाबाई भ्र.नारायण विंगकर या नगरपालिकेच्या स्त्री सभासद, सौ. वासंतिकाबाई भ्र.वसंतराव दातार १९४६ ते १९४७ नगरपालिकेच्या पहिल्या स्त्री उपाध्यक्ष, सौ. यशोदाबाई भ्र.महादेव वाटवे १९५२ सालापासून नगरपालिकेच्या सभासद, महिला मंडळाच्या प्रमुख कार्यकर्त्या, सौ.खुदैजा भ्र.उमर नदाफ १९५२ सालापासून नगरपालिकेच्या सभासद होत्या. नगरपालिकेच्या राजकीय क्षेत्रात महिलांचा

सहभाग दिसून येत असला तरी, पुरुषांच्या तुलनेत हा अगदीच अल्प प्रमाणाचा होता. महिलांवर प्रत्यक्ष-अप्रत्यक्षपणे पुरुषांचा प्रभाव असल्याचे दिसून येते. त्यामुळे राजकीय भागीदारीमध्ये महिलांच्या सहभागाबाबत असणाऱ्या उदासीनतेचे प्रमुख कारण हे रुढीवादी समाज आहे. यामध्ये पुरुषी वर्चस्व अधिक असल्याने स्त्रियांना राजकीय क्षेत्रात कोणतेही निर्णय घेण्याचे स्वातंत्र्य प्राप्त होतच नाही तिला केवळ, ''चूल आणि मूल'' हेच लागू पडते असा विचार करण्यात येऊन त्यांना असणारा राजकीय क्षेत्रातील प्रवेश नाकारण्यात येत होता. यावर योग्य निर्णय निश्चित करण्यासाठी उपेक्षित राहिलेल्या स्त्रियांचा विकास पुरुषांच्या बरोबरीने करण्यासाठी सरकारद्वारे अनेक प्रयत्न करण्यात आले. याचे फलित भारतीय संविधानाच्या स्वरूपात महिलांना प्राप्त झाले. मूलभूत हक्क, मार्गदर्शक तत्वे, मूलभूत कर्तव्ये स्त्रियांना त्यांचा विकास करण्यासाठी प्राप्त झाली. पुढे जाऊन महिलांच्या संदर्भात येणाऱ्या अधिकारांमध्ये वृद्धी होऊन ७३ वी व ७४ वी घटना दुरुस्ती संविधानातील कलम २४३ (घ) (३) व कलम २४३ (न) (३) नुसार, पंचायत नगरपालिकांमध्ये प्रत्यक्ष निर्वाचित सभासदांच्या एकूण संख्येमध्ये एक तृतीयांश स्थान अनुसूचित जाती, जनजाती स्त्रियांसाठी आरक्षित करण्यात आले. स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये सहभागी होण्यासाठी विशेष आरक्षणाची तरतूद करण्यात आली. महिलांच्या वाढत्या सकारात्मक सहभागाचा विचार करता, १४ एप्रिल २०११ रोजी यामध्ये आणखी सुधारणा करण्यात आली व स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये महिलांना ५०% आरक्षण निश्चित करण्यात आले. महिलांचा सहभाग निराशाजनक असला तरी, कालांतराने त्यांचा सहभाग वाढू लागला.

सद्यस्थितीत नगरपालिकेच्या कामकाजांमध्ये समाविष्ट होणाऱ्या महिलांच्या संख्येत वेगाने वृद्धी होत असून हे सशक्तिकरणाचे प्रमाण मानावे लागेल. याची पुष्टी करण्यासाठी पुढील प्रमाणे कराड नगरपालिकेच्या स्त्री नगराध्यक्षांची यादी दर्शविण्यात आली आहे.

**कराड नगरपालिका कराड**

| अ.क्र. | अध्यक्ष्यांचे नाव | सन |
|---|---|---|
| १. | सौ. अर्चना अशोकराव पाटील | १७/१२/१९९६ ते १६/१२/१९९७ |
| २. | सौ. सूर्यवंशी बाळूताई भिमराव | १७/१२/१९९७ ते ०४/०९/१९९८ |
| ३. | सौ.जाधव शारदा मुकुंद | १७/१२/२००१ ते १६/१२/२००६ |
| ४. | सौ.लोखंडे सुषमा नरेंद्र | १७/१२/२००६ ते २०/०५/२००८ |
| ५. | सौ.जाधव शारदा मुकुंद | १४/०१/२००९ ते १६/१२/२०११ |
| ६. | सौ. हिंगमिरे उमा उदय | १९/१२/२०११ ते १३/०७/२०१४ |
| ७. | ॲड. साळुंखे विद्याराणी घन:श्याम | १४/०७/२०१४ ते २१/१२/२०१४ |
| ८. | सौ. देसाई संगीता आनंद | ०४/०१/२०१६ ते २६/१२/२०१६ |
| ९. | सौ. रोहिणी उमेश शिंदे | २७/१२/२०१६ ते २६/१२/२०२१ |

संदर्भ : कराड नगरपालिका शासकिय नोंदणी

सौ.जाधव शारदा मुकुंद २००१ ते २००६, सौ. लोखंडे सुषमा नरेंद्र, २००६ ते२००८,सौ.शिंदे रोहिणी उमेश २०१६ ते २०२१ अशाप्रकारे महिलांचा सहभाग साधारणतः ७३ वी व ७४ वी घटना दुरुस्ती १९९२ नंतर प्रत्यक्ष राजकीय प्रक्रियेमध्ये दिसू लागला. कराड नगरपालिकेच्या राजकीय व्यवस्थेमध्ये महिलांचा सक्रिय सहभाग लक्षात घेताना काही महिलांचा या ठिकाणी उल्लेख करणे आवश्यक आहे.

सौ.शारदा मुकुंदा जाधव यांनी त्यांच्या कार्यकाळात महिला व बालकल्याण समितीच्या सभापती म्हणून कार्य पाहिले, सार्वजनिक ठिकाणी दिवाबत्तीची सोय, स्वच्छतेची व्यवस्था याचबरोबर त्यांच्या कार्य काळामध्ये ''जैविक कचरा निर्मूलन प्रकल्प'' महाराष्ट्रात कराडच्या नगरपरिषदेने प्रथम उभा केला होता. सौ.रोहिणी उमेश शिंदे यांची निवड झाल्यापासून त्यांनी शहरात अमुलाग्र असे बदल केले.महिला बचत गट तयार करून त्यांना उद्योगास प्रोत्साहन देण्यासाठी बाजारपेठ मिळवून दिली, साथीच्या रोगांचा प्रादुर्भाव कमी करण्यासाठी उपाययोजना, स्वच्छतेच्या बाबतीत आज कराड हे शहर केंद्रीय पातळीवर अग्रस्थानी असल्याचे दिसून येते. महिला या

भावनाप्रधान असतात त्यामुळे, समाजातील प्रत्येक बाबींचा त्या सखोल विचार करूनच निर्णय घेतात. कराड नगरपालिकेमध्ये वृद्धिंगत होणाऱ्या महिलाच्या सहभागामुळे शहराच्या विकासाच्या प्रक्रियेतही वृद्धी होत आहे. या सर्व बाबींवरून लक्षात येते कि, महिलांचे सबलीकरण होत आहे. निरक्षर असणाऱ्या काही महिलाही आज नगरपालिकेचा कार्यभार जागरूकपणे सांभाळत असून त्यांनी आपल्या व्यक्तिमत्त्वाची वैशिष्ट्यपूर्ण छाप पाडून राजकीय क्षेत्रातील आपले स्थान बळकट केले आहे. १९९२ नंतर राजकीय पटलाचा विचार केल्यास महिला केंद्रबिंदू असल्याचे दिसून येते. पुरुषांपेक्षा महिला राजकारणात सुयोग्य पद्धतीने काम करू शकतात. त्यामुळे भविष्यकालीन परिस्थितीतही, राजकीय क्षेत्रामध्ये विकासाचे दायित्व हे महिलांकडे राहील हे दिसून येते. एकूणच विचार करता, राजकीयव्यवस्थेमध्ये स्त्रियांच्या सहभागामध्ये वृद्धी होत आहे परिणामी, शहराच्या राजकीय विकासात महिलांचेयोगदान महत्त्वाचे बाब ठरणार आहे.

**संशोधनाचे उद्दिष्ट**

१) स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये महिलांच्या अधिकच्या सहभागास प्रोत्साहित करणे.

२) महिलांच्या सक्षमीकरणासाठी शिक्षणामध्ये या संदर्भात जागरूकता प्रसारित करणे.

३)कराड शहरातील राजकारणामध्ये स्त्रियांच्या सकारात्मक सहभागाचा अभ्यास करणे.



**संशोधन पद्धती**

- प्राथमिक साधने-

संशोधनामध्ये प्राथमिक साधनांचा वापर केला आहे. यासाठी शासकीय अहवाल,औपचारिक चर्चा, प्रत्यक्ष संपर्क इत्यादी. स्रोतांचा उपयोग केला आहे.

- दुय्यम साधने-

दुय्यम साधनांचा वापर करीत असताना वर्तमानपत्रे, मासिके, पाक्षिके, साप्ताहिके, प्रकाशित व अप्रकाशित शोधनिबंध इत्यादींचा उपयोग केला आहे.

**निष्कर्ष**

१) कराड शहरातील राजकीय क्षेत्रातील महिलांचा सहभाग वाढत आहे.

२)कराडच्या शहर व्यवस्थेसाठी महिलांची कामगिरी अमूल्य आहे.

३) ७३ व ७४ वी घटनादुरुस्ती १९९२ नंतर महिलांचा राजकीय व्यवस्थेतील सहभाग वाढत आहे.

४) राजकीय क्षेत्रातील आरक्षण प्राप्तीनंतर महिलांचा राजकारणात सक्रिय सहभाग राहिला आहे.



**संदर्भसूची**

१) डॉ.शोभा कारेकार आणि डॉ.शरद घोडके: महाराष्ट्राचे शासन आणि राजकारण पेज क्र.३१० आ. २९ ऑ. २००४ अंशुल प्रकाशन नागपूर.

२) Sushma sahay, (1998), Women and Empowerment Approaches and Strategies, Discovery publication house New Delhi.

३)विद्याधर पुरुषोत्तम गोखले/ काशिनाथ धोंडो देशपांडे (२००८) "कऱ्हाड समग्र दर्शन" श्रीधर मुद्रणालय, कराड.

४) राजश्री शामराव पाटील(२००४) कराड नगरपालिकेचा इतिहास १८५५ ते १९९३.